सकाळ

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

# शिकाऊ उमेदवारांसाठी जाहीर सूचना

अधिक्षक अभियंता, महावितरण, बारामती ग्रामीण मंडल, ऊर्जा भवन, बारामती या आस्थापनेवर शिकाऊ उमेदवार अधिनियम १९६१ नुसार एक वर्ष (२०२३-२०२४) कालावधीसाठी एकुण ९९ शिकाऊ उमेदवार **(वीजतंत्री/तारतंत्री)** भरण्यासाठी अर्ज मागविण्यात येत आहे.

**Establishment Registration Number**

**१. बारामती विभाग- E 10162700202.**

**२. सासवड विभाग- E 05202701183.**

**३. केडगाव विभाग – E 10162700361.**

इच्छुक उमेदवारांनी **दि.१०.०३.२०२३ ते दि.२१.०३.२०२३** सायं ६.०० वाजेपर्यत **(www.apprenticeshipindia.org)** या संकेत स्थळावर Online नोंदणी करावी व खालील प्रमाणे कागदपत्रे **अधीक्षक अभियंता, महावितरण, ऊर्जा भवन भिगवण रोड, बारामती** या कार्यालयात प्रत्यक्ष येवुन जमा करावे.

१. सदर भरती ही फक्त पुणे जिल्हातील औद्योगीक प्रशिक्षण संस्थामधुन उत्तीर्ण **(भोर, पुरंदर, शिरूर, दौड, बारामती, इंदापुर तालुक्यातील)** येथील **स्थानिक रहिवासी** असलेल्या उमेदवाराकरिता राहील.

अ. On Line Apprenticeship Registration.

ब. On Line Apprenticeship Application.

क. एस.एस.सी.उत्तीर्ण गुणपत्रक/शाळा सोडल्याचा दाखला व वीजतंत्री / तारतंत्री उत्तीर्ण गुणपत्रिका (४ सेमीस्टर) मुळ/ झेरॉक्स, आधार कार्ड.

ड. जात प्रमाणपत्र (अनु. जाती/ अनु. जमाती प्रवर्ग)

२. शैक्षणिक अर्हता:- महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, (एम.एस.बी.एस.एच.एस.सी.ई) यांचे १० + २ बंधामधील माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र किंवा तत्सम परिक्षा व औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील व्यवसाय पाठयक्रम पूर्ण केल्यावर राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी वीजतंत्री / तारतंत्री अथवा सेटर ऑफ एक्सलन्स (इलेक्ट्रीकल सेक्टर) व्यवसायातील दिलेले राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण अथवा २ (दोन) वर्ष पदविका (वीजतंत्री / तारतंत्री) प्रमाणपत्र .

३. वयोमर्यादा:- जाहीरातीच्या तारखेस १८ वर्ष पुर्ण असावे व जास्तीत जास्त वय ३० वर्ष. (अ.ज.व अ.जा करिता ५ वर्ष शिथीलक्षम)

४. विद्यावेतन:- शासकिय नियमाप्रमाणे देय राहील.

५. **जानेवारी २०२० ते ऑक्टोबर – २०२२** या कालावधीत ITI उत्तींण असणारे उमेदवार निवड प्रक्रियेसाठी पात्र राहतील.

६. चुकीचे अथवा अपुर्ण माहिती असलेले व **रजिस्टर पोस्टाने** आलेले अर्ज ग्राहय धरले जाणार नाही.

८. मा.तहसीलदार यांचे रहिवासी प्रमाणपत्र.

९. उमेदवार यांनी कागदपत्रे छाननी / पडताळणी करिता उपस्थित राहणे आवश्यक आहे.

१०. **दि.१७.०४.२०२३** रोजी मुळ कागदपत्रे तपासणीसाठी पात्र उमेदवार यांची यादी **अधीक्षक अभियंता महावितरण, यांचे कार्यालय, ऊर्जा भवन भिगवण रोड, बारामती** येथे **सूचना फलकावर** प्रसारित करण्यात येईल.

११. **दि.१८.०४.२०२३** रोजी पात्र उमेदवाराची मुळ कागदपत्रांची छाननी / पडताळणी सकाळी १०.०० ते दुपारी २.०० पर्यत **वीजतंत्री** व दुपारी ३.०० ते ६.०० पर्यत **तारतंत्री** यांचे मुळ कागदपत्रे तपासणी, **ऊर्जा भवन बारामती** येथे करण्यात येतील.

१२. **दि. २६.०४.२०२३** रोजी दुपारी ४.०० वाजता शिकाऊ उमेदवार (वीजतंत्री / तारतंत्री) यांची अंतीम निवड यादी **बारामती ग्रामीण मंडल** येथे **सूचना फलकावर** प्रसारीत करण्यात येईल.

१३. कामाचे ठिकाण **बारामती ग्रामीण मंडल** परिक्षेत्र राहिल.

१४. अंतीम यादीतील निवड झालेले उमेदवार हे विहीत वेळेत उपस्थित न राहिल्यास शिकाऊ उमेदवार यांची नियुक्ती रद्द करण्यात येईल यांची नोंद घ्यावी.

१५. सदर निवड प्रक्रियेदरम्यान कोणत्याही उमेदवाराला फोनद्वारे अथवा सोशल मिडियाद्वारे संदेश पाठविला जाणार नाही यांची नोंद घ्यावी.

१६. शिकाऊ उमेदवार निवड प्रक्रियेत आवश्यकता भासल्यास बदल करण्याचे सर्व अधिकार निम्नस्वाक्षरीकार यांना राहील.

**पि.आर.ओ. क्रमांक बाप/१९५/२०२२-२३** **(चंद्रशेखर पाटील)**

**अधीक्षक अभियंता (बाग्रामं) बारामती**

Pune, Main
10/03/2023 Page No. 2